# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

**शिष्यवृत्ती कक्ष**

## शैक्षणिक सत्र 2018-19 शिष्यवृत्तीसंदर्भात सूचना (19.01.2019)

**सुप्रिय विद्यार्थी,**

आपण शैक्षणिक सत्र 2018-19 साठी मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला आहे. भारत सरकारची राज्य सरकारमार्फत राबविली जाणारी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी लागू असल्यामुळे आपणास यावर्षी शिष्यवृत्तीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यामुळे ब-याच विद्यार्थ्यांनी या पर्यायाची निवड करून कुठलेही शुल्क जमा न करता अथवा काही प्रमाणात शुल्क जमा करून प्रवेश घेतलेला आहे.

अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. आपण प्रवेश घेऊन शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यास आपल्या वतीने आपले शुल्क शासनाकडून विद्यापीठाला प्राप्त होणार असून आपणास निर्वाह भत्ता देखील शासनाकडून मिळणार आहे. तर काही प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शुल्काचा काही भार शासन उचलणार आहे. मात्र यासाठी विद्यार्थ्याने दि. 31 जानेवारी 2019 पूर्वी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी सदर पर्यायाची निवड केली नाही व संपूर्ण शुल्क जमा करून प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळविता येणार असून त्यांनी शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यास व शासनाने त्यांची शिष्यवृत्ती मंजूर केल्यास त्यांनी यापूर्वी विद्यापीठाकडे जमा केलेले शुल्क त्यांना परत मिळणार आहे. मात्र अशा विद्यार्थ्यांनीही दि. 31 जानेवारी 2019 पूर्वी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा पर्याय निवडला आहे मात्र अद्यापपर्यंत Online शिष्यवृत्ती अर्ज सादर केला नाही, अशा विद्यार्थ्यांनी तात्काळ संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क जमा करावयाचे आहे.**

शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यासाठी महत्वपूर्ण सूचना पुढे देत आहे.

ज्या सुप्रिय विद्यार्थ्यांनी यापूर्वी शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेला आहे. अशा विद्यार्थ्यांनी सोबतच्या यादीतील सर्व मूळ दस्तावेज (Original Documents) च्या स्कॅन प्रती scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर सादर करावयाच्या आहेत.

ज्या सुप्रिय विद्यार्थ्यांनी यापूर्वी शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेला नाही, मात्र शिष्यवृत्ती अर्ज सादर करावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांनी शासनाने शिष्यवृत्तीसाठी तयार केलेल्या mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावरून शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाचे आहेत.

शिष्यवृत्ती अर्ज आपण आपल्या घरातून, इंटरनेट कॅफेतून किंवा शासनाने निर्माण केलेल्या काही संस्थांद्वारे सादर करू शकतात. विद्यार्थ्यांना सदर अर्ज सादर करण्यासाठी कमीत कमी वेळ लागावा यासाठी विद्यार्थ्यांनी सोबतच्या यादीतील सर्व मूळ दस्तावेज स्कॅन करून आपल्या सोबत ठेवावयाचे आहेत. हे स्कॅन केलेले दस्तावेज आपणास अर्ज सादर करताना आवश्यक आहेत. तसेच या स्कॅन केलेले दस्तावेज प्रती scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर सादर करावयाचे आहेत.

**सद्यस्थितीत विद्यापीठासाठी लागू असणारी शिष्यवृत्ती योजना पुढीलप्रमाणे**

**अनसूचित जाती (SC)** – समाज कल्याण व विशेष सहाय्य विभाग (Social Justice & Special Assistance Department) या विभागांतर्गत Government of India Post Matric Scholarship ही योजना

**अनसूचित जमाती (ST)** – आदिवासी विकास विभाग (Tribal Development Department) या विभागांतर्गत Post Matric Scholarship Scheme (Government of India) ही योजना

**विमुक्त जाती भटक्या जमाती (VJNT)** – विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग (VJNT, OBC & SBC Welfare Department) या विभागांतर्गत Post Matric Scholarship to VJNT Students ही योजना

**इतर मागास वर्ग (OBC)** – विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग (VJNT, OBC & SBC Welfare Department) या विभागांतर्गत Post Matric Scholarship to OBC Students ही योजना

**विशेष मागास वर्ग (SBC)** – विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग (VJNT, OBC & SBC Welfare Department) या विभागांतर्गत Post Matric Scholarship to SBC Students ही योजना

उपरोक्त योजनांशिवाय इतर योजना दिसत असल्या तरी त्यासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत. या योजना मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी नाहीत. महाराष्ट्रातील सर्वच महाविद्यालयांना विविध योजना लागू असल्याने व महाराष्ट्रभरातील विद्यार्थी अर्ज करू शकत असल्याने सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी या योजना एकाच ठिकाणी दिसत आहेत.

**या व्यतिरिक्त सर्वच प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी असणारी राजर्षी छत्रपती शाहू महराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना लागू करण्यासाठी विद्यापीठ व शासन स्तरावर प्रयत्न सुरू असून लवकरच सदर योजनेसाठीही विद्यार्थ्यांना अर्ज सादर करता येतील. यात उपरोक्त प्रवर्गाव्यतिरिक्त इतरही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ मिळू शकेल.**

**Online शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

- विद्यार्थ्याने शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांसाठी तयार केलेल्या mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन आपल्या आधार कार्डच्या सहाय्याने स्वत:ची प्रोफाईल तयार करावयाची आहे.

ही प्रोफाईल तयार करताना ज्या आवश्यक दस्तावेजांची आवश्यकता आहे, ते अपलोड करावयाचे आहेत. इथे आपण यापूर्वीच स्कॅन केलेले दस्तावेज अपलोड करावयाचे आहेत.

- संकेतस्थळावरील माहिती भरताना Personal Details (वैयक्तिक माहिती) भरताना विचारलेली माहिती योग्य प्रकारे भरावयाची आहे. यात मोबाईल क्रमांक व email id विद्यार्थ्याने आवर्जून भरावयाच आहे, ते आवश्यक आहे, कारण शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यानंतर शासनाकडून किंवा विद्यापीठाकडून त्यांना मोबाईल क्रमांकावर Text Message व मेल द्वारे वारंवार त्यांच्या अर्जाच्या सद्यस्थितीबद्दल कळविण्यात येणार आहे, त्यामुळे आपणास कुठेही न जाता आपल्या अर्जावर काय कार्यवाही सुरू आहे ते बघता येणार आहे.
- विद्यार्थ्याने Permenant Address Details (कायमचा राहण्याचा पत्ता) येथील माहिती संपूर्ण बिनचूकपणे भरावयाची आहे.
- त्यानंतर Correspondence Address Details (पत्रव्यवहाराचा पत्ता) काही विद्यार्थ्यांचा कायमचा पत्ता व पत्रव्यवहाराचा पत्ता वेगवेगळा असल्यास यातील माहिती संपूर्ण व बिनचूकपणे सादर करावयाची आहे. तोच पत्ता असल्यास वरीलप्रमाणेच पत्याची नोंद करावयाची आहे.
- Income Details (उत्पन्नाबद्दल माहिती) मध्ये विद्यार्थ्याने आर्थिक वर्ष 2017-18 च्या मूळ उत्पन्नाची नोंद येथे करावयाची आहे. वडिलांच्या नावाने व शैक्षणिक कारणासाठी असा उल्लेख असलेला उत्पन्न दाखला विद्यार्थ्याने अपलोड करावयाचा असून माहिती भरावयाची आहे. ज्या विद्यार्थ्यांचा उत्पन्न दाखला वडिलांच्या नावे नाही, त्यांनी वड़िलांचे नावे उत्पन्न दाखला का नाही याचा विनंती अर्ज लिहून उत्पन्न दाखल्यासोबतच या विनंती अर्जाची स्कॅन प्रत अपलोड करावयाची आहे. वडिलांचा मृत्यू झाला असल्यास वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्रही उत्पन्न दाखल्यासोबत एकत्रितपणे स्कॅन करून अपलोड करावयाचे आहे. विवाहित महिला विद्यार्थ्यांनी पतीच्या नावाचा उत्पन्न दाखला जोडावयाचा असून त्यासोबत नाव बदलाच्या राजपत्राची किंवा शपथपत्राची स्कॅन प्रत उत्पन्न दाखल्यासोबत एकत्रितपणे स्कॅन करून अपलोड करावयाची आहे.
- Domicile Details (रहिवाशी दाखला) शासनाच्या कार्यालयातून सदर दाखला काढून त्याबद्दलची माहिती येथे नमूद करावयाची असून या दाखल्याची मूळ प्रत स्कॅन करून अपलोड करावयाची आहे.
- Cast Details (जात प्रमाणपत्र) विद्यार्थ्यांनी त्यांच्या जात प्रवर्गाची माहिती येथे नमूद करावयाची असून जातीचा मूळ दाखला अपलोड करावयाचा आहे. व्यावसायिक शिक्षणक्रमाच्या विदयार्थ्यांनी (उदा. MBA) जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate) ची मूळ प्रत जात दाखल्यासोबतच एकत्रितपणे स्कॅन करून येथे अपलोड करावयाची आहे. **विमुक्त जाती भटक्या जमाती (VJNT), इतर मागासवर्ग (OBC) व विशेष मागास प्रवर्गाच्या (SBC) विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र व लागू असल्यास जात वैधता प्रमाणपत्राबरोबरच Non Cremy Layer व रेशन कार्डची मूळ प्रत अपलोड करावयाची आहे.**
- Personal Eligibility Details (वैयक्तिक पात्रता) येथे विद्यार्थ्याने नोकरी व अपंगत्वाबद्दलची माहिती नमूद करावयाची आहे. विद्यार्थी अपंग असला तरी त्याने उपरोक्त शिष्यवृत्ती योजनांचीच निवड करावयाची आहे.
- Parents/Guardians Details (पालकाची माहिती) येथे विद्यार्थ्याने पालकांबद्दलची माहिती नमूद करावयाची आहे.

- Past Qualification Details (मागील शिक्षणक्रमाबद्दलची माहिती) यात विद्यार्थ्याने शैक्षणिक सत्र 2018-19 पूर्वी शेवटी घेतलेल्या शिक्षणक्रमाची नोंद करावयाची असून त्याच्या मूळ प्रती अपलोड करावयाच्या आहेत. यात पूर्वशिक्षणाच्या गुणपत्रिकेबरोबरच शाळा महाविद्यालय सोडल्याचा दाखला एकत्रितपणे स्कॅन करून अपलोड करावयाचा आहे. उदा. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने 12 वी उत्तीर्ण दाखला व 12 वी चा शाळा/महाविद्यालय सोडल्याचा, तर MBA च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पूर्वीच्या पदवी किंवा पदव्युत्तर पदवीची गुणपत्रिका व महाविद्यालय सोडल्याचा दाखला एकत्रितपणे स्कॅन करून अपलोड करावयाचा आहे.
- Current Course Details (सध्या प्रवेशित असलेल्या शिक्षणक्रमाबद्दलची माहिती) यात विद्यार्थ्याने या शैक्षणिक सत्रात कुठल्या शिक्षणक्रमास प्रवेश घेतला आहे, त्याबद्दलची माहिती बिनचूकपणे नोंद करावयाची असून आवश्यक तेथे शुल्क जमा केले असल्यास त्याची पावती किंवा विद्यापीठाकडून बोनाफाईड प्रमाणपत्र मिळाले असल्याची त्याची प्रत अपलोड करावयाची आहे. ही माहिती सादर करताना Stream व शिक्षणक्रमाचे नाव बिनचूकपणे निवडायचे असून Institute State b Institute District नाशिक निवडायचे आहे. येथे नाशिक निवडल्यावरच College /School Name मध्ये आपणास Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik हा पर्याय दिसेल व तोच निवडायचा आहे. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील कुठल्याही केंद्रावर प्रवेश घेतलेला असेल तरी त्याच्या जिल्हा व तालुका नाशिक निवडून आपल्या अभ्यासकेंद्राचे नाव न निवडता Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nahsik अशी निवड करावयाची आहे. आपल्या अभ्यासकेंद्राचे नावाची येथे निवड करू नये. यातील प्रवेशाचे वर्ष व प्रवेशाचा दिनांक विद्यार्थ्याने व्यवस्थित नमूद करावयाचे आहे, त्यामुळे आपणास निर्वाह भत्ता (Maintenance Allowance) लगेच निश्चित होतो. यात चुकीची तारीख निवडल्यास विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते.
- Current Course Details (सध्या प्रवेशित असलेल्या शिक्षणक्रमाबद्दलची माहिती) मध्ये आपल्या या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी (नीट वाचा याच शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी) शिक्षणात खंड पडला असल्यास खंड प्रमाणपत्राची स्कॅन प्रत अपलोड करावयाची आहे. (गुणपत्रिका, शाळा/महाविद्याल सोडल्याचा दाखल्यासोबत एकत्रितपणे)
- Hostel Details (वसतीगृहाबद्दल माहिती) येथे विद्यार्थ्याने Day Scholar हाच पर्याय निवडायचा आहे. याव्यतिरिक्त दुसरा पर्याय निवडायचा नाही.
- Additional Questions (इतर प्रश्न) येथे Self Declaration Form अपलोड करावयाचा आहे. सदर फॉर्म महाडिबीटी पोर्टलवर असून आपल्या सुविधेसाठी सोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्येही मी नमूना जोडलेला आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी हा अर्ज सादर करू नये. येथेच आपण सोबत दिलेले इतर दस्तावेज अपलोड करू शकता.
- अर्ज संपूर्ण भरल्यानंतर लगेचच आपणास किती शिष्यवृत्ती मिळणार आहे. याची माहिती मिळू शकते. यातील एकूण निर्वाह भत्ता (Maintenance Allowance) हा विद्यार्थ्याच्या IFSC कोडसह नमूद केलेल्या बँक खात्यावर शासनाकडून परस्पर जमा होणार असून इतर शुल्क विद्यापीठाच्या खात्यात जमा होणार आहे. म्हणजेच विद्यार्थ्याच्या वतीने विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून विद्यापीठाच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे) अशा सूचना संबंधित कार्यालयांनी दिल्यानुसार आपणास कळविण्यात येत आहे.

- विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या उपरोक्त दस्तावेजांसह पुढीलप्रमाणे दस्तावेजही अपलोड करावयाचे असून विद्यापीठाच्या scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर पाठवायचे आहेत. 1. आधार बँक लिंक दाखला, 2. बँक पासबुक मूळ प्रत (यात IFSC असणे आवश्यक आहे), 3. परिशिष्ट अ (अभ्यासकेंद्रांनी द्यावयाचे बंधपत्र), 4. परिशिष्ट ब (विद्यार्थी व पालकांची द्यावयाचे बंधपत्र, 5. नमुन्याप्रमाणे केंद्राने तयार केलेल्या लेटरहेडवर उपस्थिती प्रमाणपत्र, (सर्व माहिती नमूद करून अभ्यासकेंद्राच्या स्वाक्षरी व शिक्यासह) 6. नमुन्याप्रमाणे केंद्राने तयार केलेल्या लेटरहेडवर संपर्क सत्र हजेरी पत्रक, (सर्व माहिती नमूद करून केंद्राच्या स्वाक्षरी व शिक्यासह)
- विद्यार्थ्यांनी सोबतच्या यादीतील सर्व मूळ दस्तावेज (Original Documents) अपलोड करून लगेचच हे स्कॅन केलेले Documents scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर पाठवून द्यायचे आहेत.
- संपूर्ण अर्ज Online पद्धतीने सादर केल्यानंतर त्यांचे प्रिंट काढून त्यासोबत सोबतच्या यादीतील सर्व कागदपत्रं जोडावयाचे आहेत.
- सदर कागदपत्रं जोडलेला अर्ज अभ्यासकेंद्रावर जमा करावयाचा व अभ्यासकेंद्रांकडून घ्यावयाचे दस्तावेज अर्जाला स्वत: जबाबदारीने जोडून अभ्यासकेंद्राकडे हा अर्ज सादर करायचा.

  यात काही अडचणी असल्यास कृपया शिष्यवृत्ती कक्षाशी (0253) 2230050 / 9403774810 (रविंद्र तायडे, वरिष्ठ सहायक, शिष्यवृत्ती कक्ष) या क्रमांकावर Whatsp App च्या माध्यमातून किंवा scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर मेलच्या माध्यमातून संपर्क साधावा.

विद्यापीठाच्या शिष्यवृत्ती समूहात विभागनिहाय सामील होण्यासाठी कृपया मुक्त विद्यापीठाच्या https://www.ycmou.ac.in या संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती (Scholarship) या टॅबमधील शैक्षणिक सत्र 2018-19 शिष्यवृत्तीसंदर्भातील Whats App Group Link 11.01.2019 (Click Here) ही सूचना वाचावी.

आवश्यक कागदपत्रं अपलोड करण्याबाबत व इतर माहितीसाठी मुक्त विद्यापीठाच्या https://www.ycmou.ac.in या संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती (Schoalarship) या टॅबमधील शैक्षणिक सत्र 2018-19 मूळ कागदपत्रं अपलोड करण्याबाबत व इतर महत्वाच्या सूचना 18.01.2019 (Click Here) ही सूचना वाचावी.

शिष्यवृत्ती अर्ज सादर करणा-या सर्व सुप्रिय विद्यार्थ्यांना त्यांची शिष्यवृत्ती वेळेत मिळण्यासाठी शुभेच्छा !

PRAKASH SHANKARRAO ATKARE

Digitally signed by PRAKASH SHANKARRAO ATKARE
Date: 2019.01.19 12:01:22 +05'30'

(स्थळ प्रतीवर मा. संचालकांची स्वाक्षरी आहे)